॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे






अहिल्यानगर ▪ मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ३१५ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145 ▪ www.veerbhuminews.com




**कोपरगावातील ग्रामरोजगार सहाय्यक आक्रमक**

पान क्र. २ वर



**शेवगावात सर्वपक्षीय नेत्यांचे आत्मक्लेश आंदोलन**

पान क्र. ३ वर



**शिवसेनेच्या पुढाकाराने योजनांचा थेट लाभ**

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### कोतुळ परिसरात अवकाळी पावसाने शेती पिकांचे नुकसान

● **अकोले** – आज सोमवारी सायंकाळीअचानक आलेल्या अवकाळी पावसाचा आणि गारपिटीचा कोतूळ परिसरामध्ये शेत पिकांना मोठा फटका बसला आहे. काढणीला आलेली कांदा, गहू, मका, कोथिंबीर या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अगोदरच शेतीमालाला चांगले दर नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आलेला असताना अवकाळी पावसाच्या तडाख्याने शेतमाल मातीमोल झाला आहे. अनेक ठिकाणी गव्हाची सोंगणी चालू होती तर कांद्याची काढणी चालू असताना शेतकऱ्यांची दाणा दाण उडाली. आता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने मोठे संकट शेतकऱ्यांवर ओढवले आहे. शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळून द्यावी, अशी मागणी कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी सयाजीराव पोखरकर यांनी केली आहे.

### जामखेडमध्ये हॉटेल व्यावसायिकाची आत्महत्या

● **जामखेड** – जामखेड तालुक्यातील पिंपरखेड येथे आर्थिक व मानसिक छळाला कंटाळून एका हॉटेल व्यावसायिकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी अदानी कॅपिटलचे व्यवस्थापक मुकुंद बोरकर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत अशोक बाबासाहेब जाधव (वय ४५) हे साईराज चायनिज सेंटर हे हॉटेल चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी सहा ते सात वाजण्याच्या सुमारास त्यांनी हॉटेलमधील पत्र्याच्या अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय, जामखेड येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पत्नी सुषमा अशोक जाधव यांनी जामखेड पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, त्यांचे पती हे पूर्वी अदानी कॅपिटल या वित्त कंपनीत वसुलीचे काम करत होते. त्यावेळी त्यांनी वसुलीचे पैसे अदानी कॅपिटल चे व्यवस्थापक मुकुंद बोरकर यांच्याकडे जमा करण्यासाठी दिले होते. मात्र ते पैसे पुढे जमा न करता उलट त्यांच्याकडूनच पैशांची मागणी केली जात होती. फिर्यादीनुसार, जाधव यांनी सुमारे २ लाख ८० हजार रुपये तसेच ग्राहकांचे सुमारे १ लाख ८० हजार रुपये भरूनही अदानी कॅपिटल या संबंधित व्यवस्थापकाकडून वारंवार पैशांची मागणी व धमक्या दिल्या जात होत्या. तू पैसे भरले नाहीस तर तुझ्याविरुद्ध तक्रार करीन, अशी धमकी देत सतत मानसिक त्रास दिला. या त्रासामुळे जाधव हे अत्यंत चिंताग्रस्त झाले होते. त्यांनी माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले असे कुटुंबीयांना वारंवार सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी हस्ताक्षरात चिठ्ठी व डायरीत नोंदी करून ठेवल्याची माहितीही समोर आली आहे.

# एफआयआर ते आरोपपत्र सर्वच होणार डिजिटल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश, ६ महिन्यांची दिली मुदत

● **मुंबई । वीरभूमी** –

महाराष्ट्र पोलीस दलाला तंत्रज्ञानाने अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. गुन्हेगारी तपासात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून, पुढील सहा महिन्यांत एफआयआरपासून ते दोषारोपपत्रापर्यंतची (चार्जशीट) सर्व प्रक्रिया पूर्णपणे 'डिजिटाइज' करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात सोमवारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद पार पडली. या परिषदेला संबोधित केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कृती आराखडा मांडला. केंद्र सरकारने राज्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी दिलेल्या १०६ मुद्द्यांच्या पालनात महाराष्ट्र अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. आता आपण पुराव्यांच्या व्यवस्थापनासाठी 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. यामुळे डिजिटल पुराव्यांची सुरक्षितता वाढेल आणि त्यात कोणताही बदल करणे कोणालाही शक्य होणार नाही. ही यंत्रणा येत्या सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित करण्याच्या सूचना पोलीस महासंचालकांना देण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण (कॉन्व्हिक्शन रेट) सध्या ५० टक्क्यांच्या आसपास आहे, ते ९५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. यासाठी गेल्या ४ ते ५ वर्षांतील प्रकरणांचे 'एआय'च्या माध्यमातून विश्लेषण करण्याचे काम गुन्हे अन्वेषण विभागाला (सीआयडी) सोपवण्यात आले आहे. विशेषतः सत्र न्यायालयांमधील निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष रणनीती आखली जात असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

गडचिरोलीत माओवादाचा बीमोड करताना आमच्या २४४ पोलिसांनी बलिदान दिले आहे. त्यांच्या शौर्याची दखल घेत, ज्या जवानांनी 'सी-६०' दलात किमान ३ वर्षे सेवा बजावली आहे, त्या सर्वांना 'सी-६० पदक' देऊन सन्मानित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना



राबवण्यात येणार आहे. अंमली पदार्थांच्या तस्करी आणि विक्रीविरुद्ध राज्यात लवकरच एक मोठी मोहीम उघडली जाईल. पोलीस महासंचालक यासंदर्भातील सविस्तर रणनीती लवकरच सादर करणार आहेत, असे फडणवीस म्हणाले.

रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नागपूरमध्ये राबवण्यात आलेल्या प्रायोगिक मॉडेलमुळे तेथील अपघातांत ३० टक्क्यांनी घट झाली आहे. हेच यशस्वी 'नागपूर मॉडेल' आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील प्रयोगांच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### गुन्हे सिद्धीचा दर ९५ टक्क्यांवर नेणार

▪ राज्यातील कन्व्हिक्शन रेट (अपराध सिद्धीचा दर) सध्या ५० टक्क्यांच्या आसपास आहे, तो ९५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे ध्येय सरकारने ठेवले आहे. यासाठी गेल्या ४-५ वर्षांतील ज्या केसेसमध्ये आरोपी सुटले, त्यांचे एआयच्या माध्यमातून विश्लेषण करण्याचे आदेश सीआयडीला देण्यात आले आहेत. तपासात कुठे त्रुटी राहिल्या, याचा अभ्यास करून नवीन धोरण आखले जाणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## एलपीजी 'गो गॅस' दरवाढीविरोधात रिक्षा चालकांचा एल्गार; पूर्वीचे दर लागू करण्याची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने एलपीजी 'गो गॅस'च्या वाढत्या दरांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून तीव्र निषेध नोंदवण्यात आला. शहरात एलपीजी गॅसचे दर दुप्पटपेक्षा जास्त वाढवून सुमारे १०० रुपयांपर्यंत नेण्यात आल्याने रिक्षा चालकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून, युद्धपूर्वीचा ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर दर तात्काळ लागू करावा, अशी मागणी करण्यात आली.

संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२६ पूर्वी एलपीजी 'गो गॅस'चा दर ४२.५० रुपये प्रति लिटर होता. मात्र इराण-अमेरिका संघर्षानंतर दररोज दरवाढ होत जाऊन आज ते शंभरी पार गेले आहेत. केंद्र व राज्य सरकार दरवाढ होणार नसल्याचे सांगत असताना गॅस कंपन्या कोणाच्या आदेशाने दरवाढ करत आहेत, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

रिक्षा चालकांचा आरोप आहे की, गॅस दरवाढीसोबतच गॅस भरण्यातही हेराफेरी होत असून, अपेक्षित मायलेज मिळत नाही. त्यामुळे एकीकडे जास्त दर आणि दुसरीकडे कमी अवरेज अशा दुहेरी फटक्यामुळे चालकांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे. दिवसभर मेहनत करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या



रिक्षा चालकांच्या उपजीविकेवर याचा गंभीर परिणाम होत आहे.

सरकारने तेल व गॅस कंपन्यांवर नियंत्रण ठेवून दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, तसेच वाहनधारकांची होणारी आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. याशिवाय रिक्षा चालकांसाठी प्रभावी आणि स्वावलंबी कल्याणकारी मंडळ स्थापन करून त्यासाठी ठोस कायदेशीर तरतुदी कराव्यात, अशीही मागणी संघटनेने केली.

राज्य शासनाने रिक्षा-टॅक्सी कल्याणकारी मंडळाची घोषणा केली असली, तरी त्यासाठी आवश्यक नियम व निधीची तरतूद अद्याप केलेली नाही. तसेच सभासद नोंदणीसाठी सक्ती केली जात असल्याचा आरोप करून ही सक्ती तात्काळ थांबवावी, अशी मागणीही करण्यात आली.

या मोर्चात संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश तात्या घुले, उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, लतीफ शेख, गणेश आटोळे, नारीस खान, सुधाकर साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षा चालक सहभागी झाले होते.

## विधानसभा पोटनिवडणुकीमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

### जिल्हा बँकेसह वृद्धेश्वर, मुळा, ज्ञानेश्वरच्या निवडणुका पुढे ढकलल्या

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

नुकत्याच जाहीर झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीमुळे सहकार विभागाने अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मे २०२६ पर्यंत पुढे ढकलल्या आहेत. याबाबत सहकार विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. या आदेशाच्या दिनांकापासून सध्या सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर ३१ मे पर्यंत लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. या आदेशातून सहकारी गृहनिर्माण संस्थांना वगळण्यात आले आहेत. यामुळे नगर जिल्ह्यातील जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांची निवडणुका दिवाळीपर्यंत लांबवणार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे अनुक्रमे बारामती, राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे. या पोटनिवडणुकीमुळे प्रशासनिक आणि पोलीस यंत्रणा व्यग्र राहणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता याबाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आदेशात म्हटले आहे.

परंतु, विभागाने सहकारी संस्थांच्या निवडणुकीनंतरची पहिली पदाधिकारी निवड करणे, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या राजीनाम्यामुळे अन्य पदाधिकार्यांची निवड करणे, पदाधिकार्याचा राजीनामा, मृत्यूमुळे रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकांची निवड करणे, क आणि ड वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत नामनिर्देशनाचा टप्पा सुरु झाला आहे, अशा निवडणुकांना हा आदेश लागू राहणार नसल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. याबाबत सोमवारी सायंकाळी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी स्वतंत्रपणे आदेश काढले आहेत.

नगर जिल्ह्यातील ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झाली होती. या यादीवर सुचना आणि हरकती घेवून येत्या १ एप्रिलाला अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणार होती. मात्र, राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीमुळे नगर जिल्ह्यातील सहकारातील अ व ब वर्गातील संस्था आणि बँकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

या निवडणूका ३१ मेपर्यंत होणार नसून त्यानंतर लगेच पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात निवडणूका होत नसल्याने दिवाळीनंतर पावसाळा संपल्यावर आता जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या निवडणुका होण्याचा अंदाज आहे. यामुळे सहकार क्षेत्रातील धुराळा काही काळासाठी उडणार नाही.

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा

## आरोपींच्या मालमत्ता जप्तीचा निर्णय । बँक बचाव समितीच्या राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, ॲड. अच्युत पिंगळे व डी. एम. कुलकर्णी यांची माहिती

● **अहिल्यानगर । वीरभूमी**–

नगर अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपी चेअरमन, संचालक, वरिष्ठ अधिकारी तसेच काही मोठ्या कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय हा ठेवीदारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व दिशादर्शक ठरला आहे. या निर्णयामुळे बँक बुडवणाऱ्या जबाबदार घटकांवर ठोस कारवाईची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.

नगर अर्बन बँकेतील चेअरमन, संचालक व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगनमताने भ्रष्ट कारभार करत बँकेचे अस्तित्व धोक्यात आणले. ठेवीदारांचा निधी धोक्यात घालून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करण्यात आले. शासन व रिझर्व बँकेकडून वेळोवेळी सूचना देऊनही सुधारणा न करता भ्रष्टाचार सुरूच ठेवण्यात आला. विशेषतः २०१४ नंतर मल्टीस्टेटच्या नावाखाली कायद्याचा गैरफायदा घेत भ्रष्टाचारात मोठी वाढ झाली.

या सर्व प्रकाराचा परिणाम म्हणून २०२३ मध्ये बँकेचा परवाना रद्द झाला आणि ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले. सुमारे ११४ वर्षांची परंपरा असलेल्या बँकेचा जवळपास १७५ कोटी रुपयांचा निधी धोक्यात आला. २०१७ पासून सभासदांना लाभांश मिळणे बंद झाले, तर अनेक कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची वेळ आली.

दरम्यान, बँक बचाव समितीने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत मोठ्या प्रमाणावर वसुली केली. आतापर्यंत ठेवीदारांना सुमारे ७० टक्के रक्कम परत मिळाली आहे. उर्वरित ३० टक्क्यांपैकी १५ टक्के रक्कम एप्रिल २०२४ मध्ये देण्याची प्रक्रिया सुरू असून उर्वरित १५ टक्क्यांसाठीही लढा सुरू राहणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. देशभरात ठेवीदारांना एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम परत मिळवून देण्याचे हे एकमेव उदाहरण मानले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने १८ मार्च २०२४ रोजी अधिसूचना काढून संबंधित आरोपी, संचालक, अधिकारी व काही कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तांची एकूण किंमत कोट्यवधी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज आहे. या कारवाईतून ठेवीदारांचे पैसे, व्याज, बँकेचा निधी, सभासदांचा लाभांश तसेच कर्मचाऱ्यांचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न होणार आहे.

तसेच, संबंधित आरोपींकडून मालमत्ता विक्री करून सर्वसामान्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी शासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अधिसूचनेत संबंधित मालमत्तांची सविस्तर यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दरम्यान, बँक बचाव समितीच्या प्रयत्नांमुळे ठेवीदारांना न्याय मिळत असून, ११४ वर्षांची परंपरा असलेली नगर अर्बन बँक पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती पत्रकार परिषदेत राजेंद्र गांधी, राजेंद्र



चोपडा, ॲड. अच्युत पिंगळे व डी. एम. कुलकर्णी यांनी दिली.

यामधील आरोपी सुरेश शिवराम सातपुते, केशव भाऊसाहेब काळे, विनोदकुमार अण्णासाहेब श्रीखंडे, अनिल चंदुलाल कोठारी, महादेव पंढरीनाथ साळवे, अजय अमृतलाल बोरा, रवींद्र विठ्ठल कडूस, सतीश विठ्ठल रोकडे, मनेष दशरथ साठे, गिरीश केदारनाथ लाहोटी, राजेंद्र केशवराव डोळे, नवनीत शांतीलाल सुपरिया, प्रगती देवेंद्र गांधी, सरोज दिलीप गांधी, शैलेश सुरेश मुनोत, दिनेश पोपटलाल कटारिया, अक्षय राजेंद्र लुनावत, केदार मुरलीधर लोहाटी, शिवदास दिलीप गायकवाड, शितल शिवदास गायकवाड, सचिन दिलीप गायकवाड, दीप्ती सुरेंद्र गांधी, देवेंद्र दिलीप गांधी, सुरेंद्र दिलीप गांधी, संदीप ईश्वरदार वाघमारे, रवींद्र विठ्ठल जेजुरकर, अशोकलाल माधवलाल कटारिया, राजेंद्र बहिरू म्हस्के, आशुतोष सतीश लांडगे या व्यक्तींची कुणीही कोणत्याही जमिनीचा व पैशाचा व्यवहार करू नये कारण जमिनी हे महाराष्ट्र शासनाकडून जप्त करण्यात येणार असल्याने व्यवहार करू नये असे बँक बचाओ समितीने सांगितले.

SPOT NEWS

## भोंदूगिरीविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

राज्यात तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात वाढत चाललेल्या भोंदूगिरीच्या प्रकारांवर तात्काळ अंकुश आणावा आणि अशा भोंदू बाबांना मिळणारा राजकीय वरदहस्त कायमचा संपवावा, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात भोंदू बाबांचा वाढता प्रभाव ही गंभीर बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. अघोरी प्रथा, आर्थिक लूट आणि महिलांचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबांनी जिल्ह्यासह राज्यभर उच्छाद मांडल्याचा आरोपही करण्यात आला. निवेदनात विशेषतः असा आरोप करण्यात आला की, अनेक भोंदू बाबांना स्थानिक तसेच राज्य पातळीवरील काही राजकीय नेत्यांचा आश्रय मिळत आहे. स्वार्थासाठी काही राजकारणी अशा बाबांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतात, त्यामुळे या प्रवृत्तीला सामाजिक व कायदेशीर संरक्षण मिळते. परिणामी, पोलीस प्रशासनावर दबाव येऊन कारवाईत टाळाटाळ होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीने प्रशासनासमोर काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. भोंदू बाबांना आश्रय देणाऱ्या राजकीय पदाधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी, पोलिसांना राजकीय दबावापासून मुक्त ठेवण्यासाठी विशेष आदेश द्यावेत, गुन्हे दाखल असलेल्या बाबांच्या कार्यक्रमांना परवानगी नाकारावी, तसेच संबंधित प्रकरणांचा तपास सीआयडी किंवा एसआयटीमार्फत करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय, भोंदूगिरी, आर्थिक गैरव्यवहार किंवा शोषणाच्या प्रकरणांत सहभागी आढळणाऱ्या लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी शासनाने स्वतंत्र शासन निर्णय (ऋठ) घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. अशा बाबांना पाठीशी घालणाऱ्या राजकारण्यांविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. हे निवेदन जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, बाबासाहेब कवेकर, प्रतिक ठोकळ आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदन देताना संविधानाचा विजय असो! भोंदूगिरीचा नाश असो! अशा घोषणा देण्यात आल्या.

## श्रीराम नवमी निमित्त माऊली सभागृहात गीतरामायणाची सुरेल मैफल

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जय श्रीराम श्रीरामनवमीच्या पावन दिनी माऊली सभागृहात संपन्न झालेल्या श्री प्रसादजी सोन्याबापू शेटे प्रस्तुत गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला रामभक्त नगरकरांचा उदंड प्रतिसाद लाभला. वेळेपूर्वीच तुडुंब भरलेलं माऊली सभागृह, कार्यक्रम सुरू झाल्यानंतर बाहेर माऊली सभागृहाच्या प्रांगणात एलईडी स्क्रीन समोर मोठ्या संख्येने उपस्थित भाविक नगरकर बघून हेच म्हणावसं वाटतं की आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर आणि स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या दैवी प्रतिभेतून निर्माण झालेल्या गीतरामायणाची गोडी आजही टिकून आहे. कवी श्रेष्ठ रवींद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे रामायण ही खरोखरच भारताच्या मौलिक भावभावनांची भागीरथी आहे. भारतीय संस्कृती रामरसात सतत भिजत आलेली आहे आणि गीत रामायण म्हणजे वाङ्मय शारदेच्या रत्नजडित मुकुटातील शिरोमणीच. याची पुनःप्रचिती यावर्षी देखील नगरकरांनी अनुभवली. गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीराम नवमीच्या शुभ मुहूर्तावर श्री प्रसादजी शेटे यांच्या पुढाकारातून आणि मुख्य स्वरातून साकारलेल्या गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला आबाल वृद्ध नगरकरांनी प्रचंड गर्दी,उत्स्फूर्त टाळ्या आणि तोंड भरून दाद देत उदंड प्रतिसाद दिला. गीत रामायणातील ५६ गीतांपैकी स्वये श्री रामप्रभू ऐकती,कुशलव रामायण गाती, दशरथा घे हे पायस दान, ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा,नकोस नौके परत फिरू ग,सेतू बांधा रे सागरी, भूवरी रावण वध झाला, प्रभो मज एकच वर द्यावा, गा बाळांनो श्रीरामायण यांसह निवडक २१ गाणी गायली गेलीत. गायकांचे उत्तम स्वर, वादकांची उत्तम साथ आणि सोबत रामकथेची सुयोग्य गुंफण असा त्रिवेणी संगम या मैफिलीत जुळून आला. यावर्षीच्या मैफिलीचे प्रमुख आकर्षण होते, ज्यांनी खुद्द बाबूजी अर्थात सुधीर फडके यांना गीतरामायण कार्यक्रमांमध्ये साथ केलेली आहे असे दिग्गज व्हायोलिन वादक पंडित रमाकांत जी परांजपे यांची व्हायोलिनची साथ. पुण्याचे श्री शैलेश देशपांडे यांनी बासरी आणि संगमनेरचे श्री सत्यजित सराफ यांनी सिंथेसायझरची साथ केली. सोबत अहिल्यानगरचे ज्येष्ठ संगीत गुरु श्री मकरंद खरवंडीकर सर यांनी हार्मोनियमची साथ केली.तबला साथ होती श्री हर्षद भावे आणि श्री प्रसाद सुवर्ण पाठकी यांची तर तालवाद्य साथ होती श्री कुलदीप चव्हाण यांची. श्री प्रसाद जी शेटे यांच्यासह त्यांची कन्या सौ श्रद्धा बाजारे शेटे आणि नगरच्या सौ रेणुका पवार या दोघींनी सीता, कौसल्या, अहिल्या, शबरी यांच्या तोंडची गाणी सुरेल गायली. कोरस साथ होती कुमारी नेहा दरवडे आणि कुमारी गौरी पवार यांची. गायक वादकांच्या उत्तम सादरीकरणासोबतच या मैफिलीची जमेची बाजू म्हणजे सौ वीणा दिघे यांचे रामकथेचे प्रभावी प्रगल्भ निरूपण. शेवटपर्यंत प्रेक्षकांना रामकथेमध्ये गुंतवून ठेवण्यात गायक वादक निवेदक यशस्वी ठरले. शिवाय गीतरामायण कमिटीचे अध्यक्ष सुरेश काका चव्हाण, उपाध्यक्ष राजहंस देसाई आणि सर्व सदस्य श्री सुभाषराव मिसाळ, राजेंद्र दासरी, बाळासाहेब परभणे, भास्कर मिसाळ आणि जयंत येलूलकर या सर्वांनी विशेष मेहनत घेतली.

# कोपरगावातील ग्रामरोजगार सहाय्यक आक्रमक

**१ एप्रिलपासून बेमुदत संपाचा इशारा । गटविकास अधिकारी व तहसीलदारांना दिले निवेदन**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ग्रामरोजगार सहाय्यकांचा संयम अखेर संपला असून, आपल्या प्रलंबित आणि न्याय्य मागण्यांकडे शासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे.



कोपरगाव येथील गटविकास अधिकारी संदीप दळवी तसेच तहसीलदार महेश सावंत यांना सविस्तर निवेदन देत, ग्रामरोजगार सहाय्यकांनी दिनांक १ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याची स्पष्ट घोषणा केली आहे. त्यामुळे येत्या काळात ग्रामीण भागातील रोजगार हमी योजनेची कामे पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दि. २ मे २०११ रोजीच्या शासन निर्णयामध्ये ग्रामरोजगार सहाय्यकांना अर्धवेळ कर्मचारी म्हणून नमूद करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात त्यांच्याकडून पूर्णवेळ स्वरूपाचे काम करून घेतले जात असल्याने त्या निर्णयामध्ये तातडीने दुरुस्ती करून पूर्णवेळ कर्मचारी म्हणून मान्यता देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच, दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या मानधनवाढीच्या शासन निर्णयाची अद्याप प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे राज्यभरातील ग्रामरोजगार सहाय्यकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक वेळा निवेदने देऊनही शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न प्रलंबितच राहिल्याने अखेर नाईलाजास्तव आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे ग्रामरोजगार सहाय्यकांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या बेमुदत संपामुळे रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेली सर्व कामे ठप्प होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, या कालावधीत कामकाजावर होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील, असा इशाराही ग्रामरोजगार सहाय्यकांनी दिला आहे.

यावेळी तालुका अध्यक्ष रामदास निकम, उपाध्यक्ष रमेश शिंदे, सचिव दत्तात्रय हेगडमल, सहसचिव देवेंद्र मोकळ, कार्याध्यक्ष नंदकुमार बिडवे, अमोल खिलारी तसेच जिल्हा कार्यकारणी सदस्य नितीन गायके, प्रवीण आहेर व मोठ्या संख्येने ग्रामरोजगार सेवक उपस्थित होते.

## नागवडे साखर कारखान्याच्या संचालकपदी एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी श्रीगोंदा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन व संचालक बाबासाहेब भोस यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदारसंघ क्रमांक १ (श्रीगोंदा गट क्रमांक १) मधील एक जागा रिक्त झाली होती. या रिक्त जागेवर नियुक्तीसाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेने दि. ३० मार्च रोजी कारखान्याच्या कार्यस्थळी संचालक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. संजय गोंदे (अध्यक्ष, प्रादेशिक उपसंचालक – साखर, अहिल्यानगर) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या नावाची सूचना संचालक लक्ष्मणराव रायकर यांनी मांडली, तर श्रीनिवास घाडगे यांनी त्यास अनुमोदन दिले.

एकनाथराव आळेकर यांनी श्रीगोंदा नगरपालिका तसेच इंदिरा गांधी नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सामाजिक व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. स्वर्गीय शिवाजीराव बापू नागवडे यांचे प्रामाणिक व निष्ठावान कार्यकर्ते म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या निवडीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे, व्हा. चेअरमन सौ. मेघाताई औटी, संचालक मंडळ सदस्य तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, दूध संघाचे चेअरमन दिलीप वागस्कर आदी मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## कोपरगावच्या चिमुकल्या कवयित्रीची राष्ट्रीय स्तरावर झेप; इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

**‘कलाकुंज’ या संग्रहानंतर बालकवयित्री रेवतीचा विविध मान्यवरांकडून गौरव**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगावच्या साहित्यविश्वासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या बालकवयित्री कु.रेवती संदीप चव्हाण हिचा अल्पवयात राष्ट्रीय स्तरावर सन्मान झाला असून कमी वयातील बालकवयित्री म्हणून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये तिची मानाची नोंद करण्यात आली आहे. तसेच तिच्या कलाकुंज या बालकविता संग्रहाच्या प्रकाशनाबद्दल विविध मान्यवरांकडून तिचा गौरव करण्यात आला. शिक्षण मंत्री मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते रेवतीचा विशेष सत्कार करून तिला शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी तिच्या साहित्यिक प्रतिभेचे आणि राष्ट्रीय स्तरावरील यशाचे कौतुक करण्यात आले.



कु.रेवती ही श्री शारदा इंग्लिश मिडियम स्कूल, कोपरगाव येथील गुणवंत विद्यार्थिनी असून अल्पवयातच आपल्या काव्यप्रतिभेच्या जोरावर साहित्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करण्यात तिने यश मिळविले आहे. तिच्या कवितांमध्ये बालमनातील निरागसता, सामाजिक जाणीव, संस्कारमूल्ये आणि सर्जनशील विचार यांचा सुंदर मिलाफ दिसून येतो.

तिच्या कलाकुंज या बालकविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा सातारा येथे आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मोठ्या उत्साहात पार पडला होता. या मानाच्या सोहळ्यात मा.नामदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले होते. या साहित्यिक व्यासपीठावर झालेल्या प्रकाशनामुळे रेवतीच्या प्रतिभेला राज्यभर विशेष ओळख मिळाली.

आजवर तिला विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक मंचांवर अनेक पुरस्कार, प्रशस्तीपत्रे आणि सन्मानचिन्हे प्राप्त झाली असून बालकवयित्री म्हणून तिने जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. तिच्या साहित्यिक कार्याची माहिती, कविता, मिळालेले सन्मान आणि उपक्रमांची माहिती तिच्या अधिकृत वेबसाईटवर ही उपलब्ध असून, ती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार आशुतोष काळे, कारभारी आगवण जनरल बॉडी सदस्य,रयत शिक्षण संस्था, तसेच कोपरगाव परिसरातील साहित्यप्रेमी नागरिकांनी कु.रेवतीचे अभिनंदन करून तिच्या साहित्यिक कार्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सामाजिक वास्तवातून साहित्याची बीजं रुजतात : डॉ. वागीश सारस्वत

**शेवगावच्या न्यू आर्ट्स महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र**

**● शेवगाव । वीरभूमी–**

आजच्या वेगवान आणि प्रोटोकॉलवर आधारित जीवनशैलीत माणसातील संवेदनशीलता हळूहळू कमी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. संबंध आणि नातेसंबंध हेच संवेदनांचे मूळ स्त्रोत असतात; मात्र आधुनिक जीवनात त्यांच्या जागी औपचारिकतेने स्थान घेतल्याने माणूस अधिक तणावग्रस्त आणि एकाकी होत आहे. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून माणसाला माणूस बनवण्याचे सामर्थ्य त्यात आहे. खरा लेखक तोच असतो, जो स्वतःच्या लिखाणावर प्रश्न उपस्थित करतो, त्यात सुधारणा करतो आणि गरज पडल्यास ते नव्याने घडवण्याची तयारी ठेवतो, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वागीश सारस्वत यांनी केले.

शेवगाव येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने ‘प्रो. सदानंद भोसले के हिंदी-मराठी काव्य में संवेदना के विविध आयाम’ या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी कर्नाटक राज्यातील अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. नामदेव गौडा हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मराठी व हिंदी साहित्यात स्वतंत्र ओळख निर्माण करणारे कवी प्रो. डॉ. सदानंद भोसले यांच्या काव्यात मानवी संवेदनांचा सूक्ष्म व व्यापक आविष्कार दिसून येतो. त्यांच्या कवितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, वैयक्तिक तसेच अस्तित्ववादी भावनांचे अनेक स्तर उलगडतात. जोपर्यंत आपण एकत्र येत नाही, तोपर्यंत खरी संवेदना निर्माण होत नाही. संवाद हा विचार पोहोचवण्याचा प्रभावी मार्ग असून सतत संवाद राहिल्यास योग्य निर्णय घेता येतात. भीती कधी कधी विकासाचा मार्गही खुला करते, कारण ती माणसाला विचार करायला भाग पाडते. संवेदना कधीच मरत नाहीत; त्या भाषेच्या पलीकडेही जिवंत राहतात, असे मत डॉ. नामदेव गौडा यांनी व्यक्त केले.




या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी अ.जि.म.वि.प्र. समाजाचे कार्यकारी मंडळ सदस्य डॉ. बाळकृष्ण मरकड होते. समारोपप्रसंगी भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे यांनी चर्चासत्रातील विषयांवर अधिक संशोधन होण्याची गरज व्यक्त केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे विभागप्रमुख प्रो. डॉ. सदानंद भोसले यांनी रचनाप्रक्रियेतील अनुभव मांडत, काव्यात सामाजिक संवेदनांना जिवंत ठेवण्याची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, डॉ. संजय नगरकर, डॉ. जयराम गाडेकर, डॉ. संतोष धोत्रे, डॉ. ईश्वर अहिर, प्रा. संदीप काळे, प्रा. मिनाक्षी चक्रे यांच्यासह सर्व प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. गोकुळ क्षीरसागर यांनी केले तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी स्वागत केले.सूत्रसंचालन प्रा. आशा वडणे यांनी केले, तर डॉ. गहिनीनाथ शेळके यांनी आभार मानले.

# जिल्हा माहिती कार्यालयातील शिपाई चिंतादेवी जयस्वार नियतवयोमानानूसार सेवानिवृत्त

**कर्मचाऱ्यांच्यावतीने स्नेहपूर्ण निरोप देत त्यांच्या कार्याबद्दल केली कृतज्ञता व्यक्त**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यरत शिपाई श्रीमती चिंतादेवी जयस्वार नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ व समर्पित सेवेनिमित्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांना स्नेहपूर्ण निरोप देत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांच्या हस्ते श्रीमती जयस्वार यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी माहिती अधिकारी अमोल महाजन, वरिष्ठ लिपीक संतोष गुजर, लिपीक आयुष बाळदे, तुषार पाटील, कॅमेरामन धनंजय जगताप, वाहन चालक प्रविण मुठे, जिल्हा कोषागार कार्यालयातील पुष्पा देवकर, मीरा कोल्हे, संगिता निमोणकर तसेच प्रदीप जयस्वार, सरिता जयस्वार, गणेश जयस्वर, आयुष जयस्वार, अक्षदा जयस्वार आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. पाटील म्हणाले, श्रीमती जयस्वार यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त व कर्तव्यदक्षता यांचे उत्तम उदाहरण घालून दिले. कार्यालयातील प्रत्येक काम त्यांनी जबाबदारीने व तत्परतेने पार पाडले. कार्यालयास त्यांची उणिव निश्चित जाणवेल, त्यांचे सेवा निवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्यमय व समाधानकारक जावे, अशी सदिच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

निरोप समारंभात सहकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, श्रीमती जयस्वार यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ, सहकार्यशील व कष्टाळू होता. त्यांनी नेहमीच सर्वांना सहकार्य केले. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे कार्यालयात एक जिव्हाळ्याची उणीव जाणवेल, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी श्रीमती जयस्वार यांनीही आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगताना सर्व अधिकारी व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यालयाकडून मिळालेल्या सहकार्यामुळेच आपण आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकलो, असे त्यांनी नमूद केले.




वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## शिरसाटवाडीचे ग्रामदैवत काळभैरवनाथ यात्रेनिमित्त जय्यत तयारी

**पाथर्डी । वीरभूमी-**

पाथर्डी तालुक्यातील शिरसाटवाडी येथील ग्रामदैवत




काळभैरवनाथाच्या यात्रा उत्सवाची जय्यत तयारी चालू आहे. यानिमित्त अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या यात्रा उत्सवाची सुरुवात एक एप्रिल पासून होणार आहे. तीन दिवस होणाऱ्या या यात्रा उत्सवाला पैठण येथून कावडीचे पाणी आणून काळभैरवनाथ देवतांच्या श्री च्या मूर्तीचा अभिषेक व महाआरती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर छबिना मिरवणूक हजेऱ्या व महाराष्ट्रातील नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचा हगामा होणार असून त्याचबरोबर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध असलेली नटखट - सुंदरा हा सदाबहार गाण्यांचा आर्केस्ट्रा होणार आहे या काळ भैरवनाथाच्या यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा कमिटीचे पंच म्हणून काम पाहणारे भानुदास शिरसाट मेजर, गोरक्ष शिरसाट मेजर, किशोर शिरसाट, संजय शिरसाट, भीमराव शिरसाट, रामा खाडे, बाबू कुटे मेजर यांनी केले आहे.

## ओम सुप्रभात ग्रुपच्या अध्यक्षपदी अशोक गायकवाड

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

बालिकाश्रम रोड परिसरातील ओम सुप्रभात ग्रुपच्या अध्यक्षपदी





निवृत्त बँक अधिकारी ॲड. अशोक गायकवाड यांची तर सचिवपदी श्री. नवनाथ कुऱ्हे यांची निवड झाली. रविवारी झालेल्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुप गत सोळा वर्षापासून नागरिकांना चालण्याचे आणि आरोग्याचे महत्त्व पटवून देत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून ग्रुपतर्फे गरजूंना मदत केली जाते. ही निवड एक वर्षासाठी राहणार आहे. या बैठकीला संस्थापक अध्यक्ष अविनाश जोशी, माजी सचिव संजय मुदगल, निवृत्त कार्यकारी अभियंता जयप्रकाश संचेती, रमेश बोरुडे, गोविंद खेर्डेकर, मधुकर साबळे, ॲड. बबनराव सुंबे आदी उपस्थित होते.

## शरणपूर वृद्धाश्रमात सेवाप्रीतची रामनवमी सामाजिक उपक्रमांनी साजरी

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

शहरातील सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने नेवासा तालुक्यातील फत्तेपूर रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमात रामनवमी उत्सवाचे औचित्य साधत एक आगळावेगळा आणि भावनिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना महिनाभर पुरेल इतका किराणा, फर्निचर साहित्य तसेच व्हील चेअर, वॉकर यांसारख्या जीवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. तसेच ऋणानुबंध ग्रुपने श्रीरामची भजणे गाऊन कार्यक्रमत रंगत आणली. या उपक्रमाची संकल्पना फाउंडेशनच्या अध्यक्षा जागृती ओबेराय व प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे यांनी साकारली. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने आणि स्नेहाने मदत करण्याचा उद्देश यामागे होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर वृद्धाश्रमातील आजी-आजोबांवर फुलांची वृष्टी करून त्यांना सन्मानित करण्यात आले. उपस्थितांनी वृद्धांमध्येच श्रीरामाचे रूप पाहून त्यांची सेवा करण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या भजन संध्या कार्यक्रमाने वातावरण अधिक भक्तिमय झाले. फाउंडेशनच्या महिला सदस्यांनी सादर केलेल्या श्रीराम भक्तिगीतांनी उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना स्वादिष्ट मिष्टान्न भोजन देण्यात आले. या प्रेमळ आदरातिथ्यामुळे आजी-आजोबांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. जागृती ओबेराय यांनी प्रेम, माया आणि सेवाभाव यांचा संदेश दिला. तसेच जीवनाचे मोल समजून घेण्याचे आवाहन केले. प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. या कार्यक्रमाला फाउंडेशनच्या सदस्यांमध्ये सौ. पूजा गंडाळ, सुरेखा बारस्कर, माधवी दांगट, मीरा बारस्कर, दीपाली देऊळकर, दीपा रोहिडा, पूनम आहुजा, स्मिता देशमुख, टीना राकेशकुमार, अंजली गायकवाड, देवयानी गुणे यांची उपस्थिती होती. तसेच शरणपूर वृद्धाश्रम कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब मुटकुळे, सचिव सुरेखा मगर, संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण, उपसरपंच दत्तात्रय गवते, फत्तेपूरचे सरपंच बाबासाहेब शेख आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महात्मा गांधींबाबत आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ

# शेवगावात सर्वपक्षीय नेत्यांचे आत्मक्लेश आंदोलन

**रामनवमी सभेनंतर वातावरण तापले । हर्षु ठाकूर व आयोजकांवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**शेवगाव । वीरभूमी -**

शेवगाव येथे रामनवमी निमित्त आयोजित सभेत हर्षु ठाकूर या महिलेने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबाबत आक्षेपार्ह व निंदाजनक वक्तव्य केल्याचा आरोप करत तिच्याविरोधात तसेच कार्यक्रमाच्या आयोजकांविरोधात राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सर्वपक्षीय पदाधिकारी, विविध संघटना व संविधानप्रेमी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.

सदर सभेत संबंधित महिलेने महात्मा गांधी यांच्याविषयी अत्यंत अवमानकारक शब्द वापरल्याचा आरोप असून, मुस्लिम व ख्रिश्चन समाजाबद्दलही द्वेषपूर्ण व शिवराळ भाषेत वक्तव्य करून समाजात तेढ व अशांतता निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या वक्तव्यामुळे समाजात वाद निर्माण होऊन शांततेला बाधा पोहोचू शकते, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर आज शेवगाव येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर सर्वपक्षीय उपोषण व आत्मक्लेश



आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान महात्मा गांधी यांच्या योगदानाचा गौरव करत, शहरात धार्मिक कार्यक्रमांच्या नावाखाली विशिष्ट समाजाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच पोलीस व प्रशासनाच्या संमतीने अशा प्रकारे दहशतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा आरोप करत संताप व्यक्त करण्यात आला.

यावेळी संबंधित महिला व कार्यक्रम आयोजक, तसेच तिचा सत्कार करणाऱ्या आमदाराविरोधात तात्काळ दखलपात्र गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुका प्रमुख ॲड. अविनाश मगरे, काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष समीर काझी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सेक्रेटरी कॉ. संदीप इथापे, शेतकरी संघटनेचे दत्ता फुंदे, माजी सरपंच एजाज काझी, धनंजय डहाळे, कॉ. बापूराव राशिनकर, दत्तात्रय आरे, दिनेश लव्हाट, समद काझी, शेख इलाही, सुरेश मगर आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, शेवगावचे पोनि. संतोष मुटकुळे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले.

## राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत जय बजरंग विद्यालयाचे यश; २५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

पाईपलाईन रोड येथील आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालय येथील प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा संवर्धन संचलित राज्यस्तरीय प्राविण्य परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थी राज्य, जिल्हा तसेच केंद्रीय गुणवत्ता यादीत झळकले असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटवला आहे.

राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत चमकलेले विद्यार्थी : इयत्ता पहिली : आडसरे श्रीनिधी गणेश (राज्यात द्वितीय), अनारसे कादंबरी योगेश (राज्यात तृतीय). इयत्ता दुसरी : घुले ईशान दीपक (राज्यात द्वितीय). इयत्ता सहावी : क्षीरसागर सिद्धेश अमोल (राज्यात द्वितीय). जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी : इयत्ता पहिली : परळकर अनिरुद्ध अक्षय (जिल्ह्यात प्रथम), आहेर नियती वैभव (जिल्ह्यात द्वितीय). इयत्ता दुसरी : आव्हाड अंजली रवींद्र (जिल्ह्यात द्वितीय), आव्हाड स्वरा रवींद्र (जिल्ह्यात चतुर्थ). इयत्ता सातवी : कुशवाह अभिषेक प्रभाशंकर (जिल्ह्यात प्रथम), उबाळे पियुष बाळासाहेब (जिल्ह्यात चतुर्थ). केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत झळकलेले विद्यार्थी : इयत्ता पहिली : गुंजाळ युग अनिल (केंद्रात चतुर्थ), विश्वकर्मा तानिया जितेंद्र (केंद्रात पंचम), बरबडे कृष्णप्रिया प्रवीण (केंद्रात पंचम). इयत्ता दुसरी : वारे प्रथमेश अशोक (केंद्रात पंचम). इयत्ता तिसरी : घुले दर्शन गणेश (केंद्रात द्वितीय). इयत्ता चौथी : बरबडे प्रेरणा प्रवीण (केंद्रात तृतीय), इयत्ता पाचवी : आडसरे श्रीलेखा गणेश (केंद्रात द्वितीय), कुलकर्णी आयुष अमृत (केंद्रात तृतीय), ठोकळ आरोही शंकर (केंद्रात चतुर्थ), मेहेत्रे कृष्णा कैलास (केंद्रात चतुर्थ), पवार शिवानी प्रवीण (केंद्रात पंचम). इयत्ता सहावी : क्षीरसागर आदेश अमोल (केंद्रात प्रथम), भवार श्रद्धा तुकाराम (केंद्रात द्वितीय), भोसले श्रीराज गणेश (केंद्रात तृतीय), पवार साक्षी कृष्णा (केंद्रात चतुर्थ). या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसचिव उमेशजी गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, सहव्यवस्थापक अमोल तोडकर यांनी अभिनंदन केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षक व पालकांचे विशेष कौतुक केले. या यशामागे विद्यालयातील मराठी विषय शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. सुरेखा दुधाडे, आशा घुले, कल्पना मिसाळ, छाया क्षीरसागर आणि राहुल मोरे यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट तयारी करून मार्गदर्शन केले.

## स्व. निर्मलाताई काकडे या समाजासाठी 'आईपण' जपणारे आदर्श व्यक्तिमत्व

**अंजली चिंतामण । चापडगाव विद्यालयात पुण्यतिथीनिमित्त अभिवादन**

**शेवगाव । वीरभूमी-**

स्व. निर्मलाताई काकडे या एक आदर्श व्यक्तिमत्व होत्या. समाज व संस्थेतील प्रत्येक घटकासाठी आईपण जपणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्या एक उत्कृष्ट मुख्याध्यापिका व शिक्षिका होत्या, असे प्रतिपादन विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. अंजली चिंतामण यांनी केले.



चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्व. निर्मलाताई काकडे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या वेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक, वत्सला जाधव, शितल दहिवाळकर, विद्यावर्धिनी मुळे, संपदा गायके, धनश्री धट, स्नेहल वैद्य, नाफिया शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना सौ. अंजली चिंतामण म्हणाल्या की, स्व. निर्मलाताई काकडे यांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या खांद्याला खांदा लावून कार्य केले. त्या इंग्रजी विषयाच्या ख्यातनाम अध्यापिका होत्या आणि त्यांचे इंग्रजी भाषेवर उत्कृष्ट प्रभुत्व होते. त्यांच्या कार्यातून त्यांनी सुसंस्कृत पिढी घडवली.

त्यांच्या कार्याचा वारसा त्यांचे सुपुत्र ॲड. डॉ. शिवाजीराव काकडे व स्नुषा सौ. हर्षदाताई काकडे हे अविरतपणे पुढे नेत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय दुधाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भारत म्हस्के यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.


## अकोल्यातील येडूबाई निसर्गगड यात्रेत भाविकांची होणारी गैरसोय टाळावी

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

अकोले तालुक्यातील पिंपळदरी येथे येडूबाई निसर्गगड यात्रेदरम्यान भाविकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असून मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत असल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. यासंदर्भात समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

दि. १ एप्रिल ते ५ एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या या यात्रेसाठी महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, गोवा, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांतून सुमारे १० ते १५ लाख भाविक मोठ्या श्रद्धेने येतात. भिल्ल समाजाचे दैवत असलेल्या येडूबाई देवीचे हे स्थान अत्यंत पवित्र मानले जाते. डोंगरावरील स्वयंभू तांदळा स्वरूपातील देवीची स्थापना प्राचीन काळापासून असून 'नवसाला पावणारी देवी' म्हणून तिची ख्याती आहे. या यात्रेला 'भिल्ल समाजाची पंढरी' किंवा 'प्रती पंढरपूर' असेही संबोधले जाते.

यात्रेत मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने दरवर्षी अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. विशेषतः मुळा नदीत आंघोळ करताना घाट नसल्यामुळे पाय घसरून पडण्याच्या घटना घडतात. या दुर्घटनांमध्ये दरवर्षी एक-दोन भाविकांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच महिलांसाठी स्वतंत्र कपडे बदलण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना उघड्यावरच कपडे बदलावे लागतात, ही अत्यंत गंभीर



बाब आहे.

यात्रेदरम्यान पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळे भाविकांना नदीचे किंवा शेतीतील पाणी पिण्याची वेळ येते. परिणामी थंडी-ताप, डायरिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव होतो. केवळ चार टॉयलेट व चार युरीनलची व्यवस्था लाखो भाविकांसाठी अपुरी ठरत आहे. त्यामुळे उघड्यावर शौचास जाण्याची वेळ येत आहे. मोबाईल नेटवर्कची मोठी अडचण असून गर्दीत हरवलेल्या व्यक्तींशी संपर्क साधणे कठीण जाते. तसेच घारगाव फाटा ते येडूबाई गड आणि अकोले मार्गावर खाजगी वाहनांकडून दुप्पट भाडे आकारले जाते. रस्ता अरुंद असल्याने वाहतूक कोंडीही मोठ्या प्रमाणात होते.

यात्रेदरम्यान काही ठिकाणी अवैध दारू विक्री होत असल्याने अनेक भाविक त्याच्या आहारी जातात. यामुळे कुटुंबीयांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाची विशेष पथके नेमण्याची मागणी करण्यात आली आहे.

समितीने प्रशासनाकडे खालील उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यामध्ये वनविभागाची मोकळी जागा यात्रेकरूंना उपलब्ध करून देणे, नदीवर सुरक्षित घाट व महिलांसाठी स्वतंत्र बदल कक्ष उभारणे, फिरते व कायमस्वरूपी टॉयलेटची व्यवस्था, मोबाईल टॉवर व पोलिस मदत केंद्र उभारणे, एनडीआरएफ पथक व स्पीड बोटची नियुक्ती, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी टँकर व्यवस्था, २४ तास फिरते दवाखाने व म्ब्युलन्स सुविध, फायर टेंडर व आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवणे, शटल बस सेवा व रस्ते दुपदरीकरण, सीसीटीव्ही व ड्रोनद्वारे निगराणी, अवैध देणगी वसुलीवर नियंत्रण, वरिष्ठ अधिकाऱ्यांची २४ तास उपस्थिती, प्रशासनाकडून तातडीच्या कृतीची मागणी करण्यात आलेली आहे.

लाखो भाविकांची आस्था असलेल्या या यात्रेत सुरक्षितता आणि सुविधा यांचा अभाव गंभीर चिंता निर्माण करणारा आहे. भिल्ल समाजाच्या परंपरा जपत भाविकांना सुरक्षित आणि सुसज्ज वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# अंधश्रद्धा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणीसाठी अंनिस कक्ष स्थापन करावा

**कोपरगावात तहसीलदारांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तालुका कार्यकारीणीची निवेदनाद्वारे मागणी**

**कोपरगाव । वीरभूमी-**

जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व भोंदूगिरीच्या प्रकरणावर तात्काळ कारवाई करण्यासाठी तालुकास्तरावर अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करावा अशी मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कोपरगाव तालुका कार्यकारिणीने मा. तहसीलदार महेश सावंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापुरुष व संतांच्या विचार स्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्रात अलीकडेच उघडकिस येत असलेल्या काही भोंदू बाबांच्या प्रकरणामुळे समाजात मोठी चिंता निर्माण झाली आहे. देवी शक्ती, चमत्कार, ज्योतिष व अध्यात्माच्या माध्यमातून अनेक ठिकाणी लोकांची आर्थिक फसवणूक, मानसिक छळ तसेच बालक व महिलांचे लैंगिक शोषण होण्याच्या घटना समोर येत आहे. अशा घटनांमुळे समाजात अंधश्रद्धा वाढण्यास व गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळण्याचा धोका निर्माण होतो या पार्श्वभूमीवर अंधश्रद्धा निर्मूलन समिती कोपरगाव यांनी तहसीलदार यांच्याकडे अंधश्रद्धा विरोधी कायदेशीर प्रभावी अंमलबजावणीसाठी अंनिस कक्ष स्थापन करावा. तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन पोलीस महासंचालकांच्या दिलेल्या आदेशानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करण्याबाबत निर्देश केलेले आहेत.सदर कक्ष स्थापन होऊन ते प्रत्यक्ष कार्यान्वित व्हावे याबाबत आपण मार्गदर्शक सूचना द्याव्यात. या कक्षात समितीत अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सदस्यांना सामावून घ्यावे तसेच भारतीय राज्यघटनेने अधोरेखित केलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालय व समाज पातळीवर जनजागृती कार्यक्रम राबविण्यात यावेत यासाठी तालुकास्तरावर स्थापन झालेल्या जादूटोणाविरोधी कायदा प्रचार, प्रसार समितीची त्वरित बैठक लावावी. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांना सुचित करून त्यात अधिकृतपणे सहभागी करून घ्यावे तसेच फल ज्योतिष, दैवी शक्ती चमत्कार किंवा बुवाबाजीच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्या व्यक्तींबाबत तालुका पोलीस प्रशासनामार्फत तात्काळ तपास करून आवश्यक त्या ठिकाणी गुन्हे नोंदणी करून कठोर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी तहसीलदार श्री. सावंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिवनिका संस्थान मिरगावचे भोंदू अशोक खरात सारखे प्रकरणे जिल्हा सह तालुका पातळीवर अस्तित्वात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपल्या मार्फत तालुका, जिल्हा पोलीस प्रशासनाला अशा प्रकारच्या भोंदूगिरी चा प्रकरणांचा तात्काळ तपास करून आवश्यक त्या ठिकाणी गुन्हे नोंदवून कठोर कारवाई करण्याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. सदर प्रकरण केवळ एका गुन्हेगारी घटनेपुरते मर्यादित नसून समाजातील अंधश्रद्धा, सत्तेचा गैरवापर आणि महिलांवरील अत्याचार याचा गंभीर परिणाम आहे. त्यामुळे यावर केवळ तात्पुरती कारवाई न करता तालुका व जिल्ह्याचे



स्तरावर दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे तेव्हा अशा प्रवृत्तींचा निर्णायक अंत करण्यासाठी आपण सुद्धा स्वतः पुढाकार घेऊन तालुका पोलीस प्रशासनाला प्रतिबंधात्मक कारवाई करणे कामी आदेश व्हावे अशी विनंती अंधश्रद्धा निर्मूलन समिती कोपरगाव कार्यकारणी तर्फे करण्यात आले आहे.

याप्रसंगी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कोपरगाव तालुका अध्यक्ष डॉ. अशोक गावित्रे तसेच प्रा. दीपक शिरसाठ, ख़िवराज दुशिंग, संदीप शिंदे, मारुती कोपरे, रामदास भुजाडे, राजेंद्र उगले, विनोद थोरात, प्रवीण आभाळे, राहुल आभाळे, किशोर शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

# शिवसेनेच्या पुढाकाराने योजनांचा थेट लाभ

## शिवसेना सचिव संजय मोरे । शेवगावात 'शासन आपल्या दारी'च्या धर्तीवर 'दिघे नागरी सहायता कक्षा'चे उद्घाटन

**● शेवगाव । वीरभूमी –**
शिवसेना ही ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्यावर चालणारा पक्ष आहे. केंद्र व राज्य सरकारच्या जनहितार्थ योजनांचा लाभ तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी हा कक्ष मोलाची भूमिका बजावेल, असा ठाम विश्वास शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सौ. हर्षदाताई काकडे व ॲड. शिवाजीराव काकडे यांच्या पुढाकाराने शेवगाव येथे 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्ष' व जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते संजीव भोर, जिल्हाध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, प्रवीण घुले, संदेश कार्ले, रामदास भोर, दीपक जंजिरे, अंकुश चितळे, अरुण मुंढे, तालुका अध्यक्ष आशुतोष डहाळे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख साईनाथ आधाट, दिलीप भागवत, एकनाथ कुसळकर, रणजित परदेशी, बाळासाहेब मडके, राज भुसे, जगन्नाथ गावडे, राम पोटफोडे, लक्ष्मण गवळी, रोहित काथवटे, संजय देशपांडे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. काकडे म्हणाले की, तालुक्यात आजवर तीन-तीन राष्ट्रीय पक्ष, मोठे कारखानदार आणि अनेक आजी-माजी आमदार



असतानाही सामान्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. त्यांच्याविरुद्ध लढण्यासाठी आम्हाला शिवसेनेच्या रूपाने एक मोठी ताकद मिळाली आहे. ताजनापूर टप्पा-दोनचे अपूर्ण काम पूर्ण करून लाभार्थी गावांतील बंधारे पाण्याने भरून देणे, तालुक्यातील बोधेगाव, सुकळी यांसारख्या दुष्काळी पट्ट्यांना पाणी उपलब्ध करून देणे आणि तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) उभारणी करणे हा आमचा मुख्य अजेंडा असून, त्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

दरम्यान, या नवीन सहायता केंद्रामुळे शेवगावच्या नागरिकांना दलालांचे उंबरठे झिजवण्याऐवजी एकाच छताखाली सर्व मदत मिळणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब सातपुते यांनी केले तर सौ. हर्षदाताई काकडे यांनी आभार मानले.

### शेवगावच्या प्रश्नांवर मंत्र्यासमवेत बैठक घेणार!

■ काकडे घराणे नेहमीच जनतेच्या पाण्यासाठी रस्त्यावर उतरून झगडत आले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शेवगावचा पाणी प्रश्न आणि चखऊ3 संदर्भात संबंधित मंत्र्यांसमवेत विशेष बैठक आयोजित करून प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन श्री. मोरे यांनी दिले.

### ११ नवीन शाखा उघडणार!

■ अवघ्या दोन दिवसांत ५४ शाखा उघडणे हे मागील ३० वर्षांपासून कार्यकर्त्यांशी जपलेल्या घट्ट नात्याचे प्रतीक असल्याचे स्पष्ट करत, तालुक्यात शेकटे बुद्रुक, बाडगव्हाण, शेकटे खुर्द, गोळेगाव, बेलगाव, शोभानगर, सोनोशी, शिंगोरी, बोधेगाव, दहिफळ आणि नवीन दहिफळ या गावांत मिळून एकूण ११ नवीन शाखा उघडण्याची घोषणा सौ. काकडे यांनी केली.

## पाथर्डी शहरातील पुतळे व स्मारकांजवळ सोलर सीसीटीव्ही बसवा

### नगरसेवक अमोल गर्जे यांची पालिकेकडे मागणी



**● पाथर्डी । वीरभूमी–**
पाथर्डी शहरातील विविध महापुरुषांचे पुतळे व स्मारकांच्या सुरक्षेसाठी तसेच प्रभाग क्रमांक ५ मधील मंदिर परिसरात सोलर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी नगरसेवक अमोल गर्जे यांनी नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शहरात विविध ठिकाणी महापुरुषांचे पुतळे व स्मारके उभारण्यात आलेली असून ती नागरिकांच्या श्रद्धा व अभिमानाचे प्रतीक आहेत. मात्र, काही ठिकाणी सुरक्षेअभावी या स्मारकांची तोडफोड किंवा विटंबना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा घटना टाळण्यासाठी आणि परिसरात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

यासाठी संबंधित पुतळे व स्मारकांच्या ठिकाणी सोलर ऊर्जे वर चालणारे सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याने वीज खर्च कमी होऊन सतत देखरेख ठेवणे शक्य होईल. तसेच कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्वरित कारवाई करणे सुलभ होणार आहे. दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने या मागणीची दखल घेतली असून लवकरच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. अशी माहिती नगराध्यक्ष अभय आव्हाड व मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी दिली.

## बडेवाडीतील भगवान गड नारळी सप्ताहासाठी पाथर्डी आगारातून दर तासाला विशेष बससेवा सुरू



### ॲड. प्रताप ढाकणे यांच्या प्रयत्नाला यश । सप्ताहासाठी १०१ क्विंटल साखरेचेही योगदान

**● पाथर्डी । वीरभूमी –**
तालुक्यातील मौजे बडेवाडी येथे संत भगवान बाबा यांनी सुरू केलेल्या ९२ व्या फिरता नारळी सप्ताहानिमित्त भाविक भक्तांसाठी विशेष बस सेवेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर तसेच पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील भाविकांसाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

पाथर्डी आगारातून दुपारी १.०० वाजल्यापासून ते रात्री ११.०० वाजेपर्यंत दर तासाला विशेष बस सोडण्यात येत आहे. या बस सेवेच्या सुरूवातीसाठी ॲड. प्रताप ढाकणे यांनी विशेष पाठपुरावा करून यश मिळवले आहे.

यावेळी मौजे बडेवाडी येथील सप्ताह समिती सदस्य तसेच तरुण सहकारी उपस्थित होते. दरम्यान, या सप्ताहासाठी ॲड. प्रताप ढाकणे यांनी १०१ क्विंटल साखरेचे योगदान दिल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

## भगवान महावीरांचे विचार विश्वाने समजून घेण्याची गरज

### आ. आशुतोष काळे । कोपरगावात महावीर जयंती उत्साहात साजरी

**● कोपरगाव । वीरभूमी –**
सत्य आणि अहिंसेची शिकवण देणारे भगवान महावीर यांची जयंती कोपरगाव शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त सकल जैन समाजाच्या वतीने कोपरगाव शहरात काढण्यात आलेल्या रथ यात्रेत सहभागी होवून आ.आशुतोष काळे यांनी भगवान महावीरांचे मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी आ.आशुतोष काळे पुढे म्हणाले की, भगवान महावीर यांचा जगा आणि जगू द्या हा संदेश केवळ एका धर्मापुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी गरजेचा आहे. शस्त्राने भूमी जिंकता येते पण मनं जिंकण्यासाठी आणि शांततेसाठी केवळ प्रेमाचा आणि अहिंसेचाच मार्ग स्वीकारावा लागतो. महावीरांनी दिलेला क्षमामार्ग हा दुर्बलतेचे नव्हे, तर बलवानाचे प्रतीक आहे. आजच्या आधुनिक आणि तणावपूर्ण जगात शांतता टिकवण्यासाठी महावीरांचे



विचार अंगीकारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाला जैन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या जयंती सोहळ्यामुळे शहरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

यावेळी जैन समाजाचे अध्यक्ष ट्रस्टी अजित लोहाडे, दिलीप अजमेरे, पंच आनंद काले, मोहित गंगवाल, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, माजी नगरसेवक मंदार पहाडे, राजेश ठोळे, आनंद पहाडे, परेश ठोळे, पियुष गंगवाल, सिद्धांत गंगवाल, अनुप ठोळे, मुनीष ठोळे, रवी ठोळे, सुरेंद्र ठोळे, नीरज कासलीवाल, सचिन ठोळे, प्रितम गंगवाल, मानव कासलीवाल, संकेत कासलीवाल, अनंत बाज, सुयोग ठोळे, सौरभ कासलीवाल, पंकज ठोळे, पियुष पापडीवाल, दिपक गंगवाल, नगरसेवक हाजीमेहमूद सय्यद, बाळासाहेब रुईकर, इम्तियाज अत्तार, राहुल शिरसाठ, वाल्मिक लहिरे, राजेंद्र वाकचौरे, शैलेश साबळे, माजी नगरसेवक रमेश गवळी, फकीर कुरेशी, दिनकर खरे, विजय त्रिभुवन, मुकुंद भूतडा, दादा नाईकवाडे, सागर आहेर, राजेंद्र खैरनार, मनोज कडू, सुनिल फंड, शुभम काळे, मनोज नरोडे, चंद्रशेखर म्हस्के, सचिन परदेशी, धनंजय कहार, सिद्धार्थ शेळके, निलेश बोरुडे, गणेश बोरुडे, रवींद्र राऊत, जनार्दन शिंदे, भाऊसाहेब भाबड, राजेंद्र जोशी, मयुर राऊत, सागर भागवत, विकास बेंद्रे, शुभम लासुरे, खंडागळे नाना, शाहरुख कुरेशी, पाटोळे, जगन कांबळे, मुनेष गुप्ता, आण्णा लोखंडे आदींसह जैन समाजाचे ट्रस्टी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीराज गिरमे याची आयआयटी कानपुर मध्ये प्रशिक्षणासाठी निवड

**● कोपरगाव । वीरभूमी –**
येथील संजीवनी युनिव्हरसिटीचा विद्यार्थी श्रीराज वैभव गिरमे याची आय आय टी कानपुर येथे सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाच्या अडीच महिने प्रशिक्षणासाठी निवड झाली. त्याबद्दल त्याचा संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी सत्कार केला. या प्रशिक्षणासाठी संपुर्ण देशभरातुन २८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन महाराष्ट्र राज्यातील तीनच विद्यार्थ्यांचा समावेश असुन त्यात कोपरगांवच्या श्रीराज गिरमे याने स्वतःबरोबरच संजीवनी युनिव्हरसिटीचा



नांवलौकीक मिळविला आहे.

श्री. कोल्हे पुढे म्हणाले की, शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे. ग्रामिण भागात राहुन श्रीराज गिरमे याने आय आय टी कानपुर येथे सायबर सिक्युरिटी अभ्यासाच्या प्रशिक्षणाची खडतर परिक्षा उत्तीर्ण केली त्याबददल त्याचे व आई वडीलांचे तसेच गुरूजनांचे अभिनंदन करावे तेव्हढे थोडेच आहे. आज जगात सायबर सुरक्षेला विशेष महत्व आले आहे. चि. श्रीराज याचे के. जी पासुन ते बी. टेक. आय टी सायबर सिक्युरिटीपर्यंतचे शिक्षण संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टीटयुट मध्येच झाले. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी ४४ वर्षापुर्वी जे स्वप्न पाहिले त्यासाठीच्या सर्व पायाभुत सुविधा संजीवनीत उपलब्ध करून दिल्या त्याचे श्रीराजने चीज केले आहे. भविष्यात तो याही पेक्षा गुणवत्ता प्रधान होईल यात शंका नाही. विद्यार्थ्यांनी शिकुन मोठे व्हावे व सर्वांचे नांव उज्वल करावे असेही शेवटी ते म्हणाले. प्रारंभी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## सामाजिक कार्याबद्दल संदीप पवार यांना मानद डॉक्टर पदवी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
आधार सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच भाजपचे शहर जिल्हा सचिव संदीप पवार यांना द मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड, दिल्ली यांच्या वतीने मानद डॉक्टर पदवी प्रदान करण्यात आल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष अनंत राठोड, जिल्हा उपाध्यक्ष विजय वडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संदीप पवार यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित घटकांना मोठा आधार मिळत असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, संदीप पवार यांनी सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी 'आधार सामाजिक संस्था'च्या माध्यमातून अनेक गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवला आहे. तसेच राजकीय पदाचा वापर ते समाजकारणासाठी करत असून, अशा व्यक्तींना मिळणारे सन्मान हे संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. ही मानद डॉक्टर पदवी त्यांच्या कार्याचा सन्मान असून, पुढील काळातही ते अधिक जोमाने समाजकार्यात योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना संदीप पवार म्हणाले की, मला मिळालेला हा सन्मान माझा नसून, माझ्या सोबत कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा आणि समाजाचा आहे. समाजातील गरजू लोकांसाठी काम करताना अनेक अडचणी येतात, मात्र लोकांच्या आशीर्वादामुळे आणि सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे. ही मानक डॉक्टर पदवी मला पुढील काळात अधिक जबाबदारीने आणि समर्पणाने काम करण्याची प्रेरणा देणारी आहे. भविष्यातही समाजहिताचे विविध उपक्रम राबवून सर्वसामान्यांच्या सेवेसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे ते म्हणाले. उपस्थितांनी संदीप पवार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# समताच्या लिक्कीडीटी बेस्ड प्रोटेक्शन अंतर्गत ९९.९४ टक्के ठेवीदारांच्या ६० लाख रुपयांपर्यंत ठेवी सुरक्षित

## संदीप कोयटे । समताच्या सभासदांना १५% लाभांश मिळणार : जितुभाई शहा यांची माहिती

**● कोपरगाव । वीरभूमी–**
गत आर्थिक वर्ष अखेर १००० कोटी रुपये ठेवीचा टप्पा समता पतसंस्थेने ओलांडला होता. दि. ३० मार्च २०२६ अखेर ११०० कोटी रुपये ठेवीचा टप्पा ओलांडुन समताच्या एकुण ठेवी ११३० कोटी रुपयांपर्यंत गेल्या आहे. आर्थिक वर्ष अखेर समता पतसंस्थेची आर्थिक पत्रके ३१ मार्चला जाहीर करण्याची परंपरा गेल्या ४० वर्षापासुन कायम राखली असुन याही वर्षी ३१ मार्च २०२६ ला शासकीय सुटटी असल्याने दि.३० मार्चला आर्थिक पत्रके जाहीर करत असुन समताच्या लिक्कीडीटी बेस्ड प्रोटेक्शन स्किम अंतर्गत ९९.९४% ठेवीदारांच्या ६० लाख रुपयांपर्यंत ठेवी सुरक्षित आहे असे समताचे संचालक श्री. संदीप कोयटे यांनी सांगितले.

ही आर्थिकपत्रके जाहीर करतांना समताचे आणखी काही वैशिष्टये त्यांनी सांगितले आहे. सहकार खात्याने घालुन दिलेल्या निकषांप्रमाणे वैज्ञानिक तरलता २५% राखणे आवश्यक असतं ती दि. ३० मार्च अखेर २७.५२% इतकी म्हणजे ३११ कोटी रुपये इतकी गुंतवणुक राखली आहे. या व्यतिरिक्त रोख तरलता १ टक्का राखणे आवश्यक असते. ही ११ कोटी ७२ लाख इतकी राखली आहे. समताचे एकूण कर्ज वाटप ८२५ कोटी रुपये आहे. तसेच समताचा संमिश्र व्यवसाय २ हजार कोटीकडे वाटचाल करीत आहे.

गत आर्थिक वर्षात समताच्या नफ्यामध्ये भरघोस वाढ झालेली असुन हा नफा ८ कोटी २५ लाख रुपयांच्या पुढे पोहचला आहे. दि.११ मे १९८६ रोजी स्थापन झालेल्या समता पतसंस्थेला यावर्षी ४० वर्ष पुर्ण होत आहे. गत ४० वर्षात कायम अ वर्ग प्राप्त झालेल्या समताच्या सभासदांना यावर्षी १५% लाभांश देण्याचा निर्णय वर्ष अखेर झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे. तसेच समता पतसंस्थेने वयाची चाळीशी ओलाडतांना गत ४० वर्ष सातत्याने सभासद असलेल्या सभासदांचा सन्मान सोहळा देखील आयोजित करणार असल्याचे समताचे व्हा. चेअरमन श्री.अरविंदभाई पटेल व जेष्ठ संचालक श्री.जितुभाई शहा यांनी सांगितले.

समता पतसंस्थेचे चेअरमन व राज्यातील पतसंस्था चळवळीचे मार्गदर्शक श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांचे अध्यक्षतेखाली समताची घोडदौड यापुढे अशीच चालु राहील असा विश्वास समता पतसंस्थेच्या महिला संचालिका सौ.श्वेता अजमेरा व सौ.अक्षरा




पटेल यांनी व्यक्त केला.तसेच समता पतसंस्थेने संचालक मंडळात तरुणांना स्थान दिल्यामुळे समतातील अत्याधुनिक तंत्रज्ञान वेगाने विकसित होत असल्याचे समताचे तरुण संचालक निरव रावलिया, दिपक अग्रवाल व गिरीष सोनेकर यांनी या प्रसंगी सांगितले.

समताने थकबाकी वसुलीत देखील नेहमीप्रमाणे विक्रम केला असुन कोणत्याही थकबाकीदारांची तक्रार न येता अत्यल्प थकबाकी ठेवण्यात समताला यश मिळाले असल्याचे वसुली विभागाचे व्यवस्थापक श्री. जनार्दन कदम यांनी सांगितले. तसेच संस्थेच्या कोपरगांव शाखेच्या ठेवी ४०० कोटी रुपयांच्या पुढे पोहचल्या असुन श्रीरामपुर शाखेच्या ११० कोटी रुपयांच्या पुढे तर राहाता शाखेच्या १२५ कोटी रुपयांच्या पुढे ठेवी पोहचलेल्या आहेत. येवला शाखेच्या ६० कोटी रुपयांच्या पुढे ठेवी असुन शिर्डी शाखेच्या ५५ कोटी रुपयांच्या पुढे ठेवी पोहचलेल्या आहेत. समताचा शाखा विस्तार २७ शाखांपर्यंत पोहचला असुन पुढील आर्थिक वर्षात ४० शाखांपर्यंत नेण्याचा संकल्प समताच्या संचालक मंडळाचा आहे.

नवीन राष्ट्रीय सहकार धोरणाप्रमाणे केंद्र व राज्य शासनाने सहकारा अंतर्गत सहकार या धोरणाला प्राधान्य दिलेले आहे. या धोरणा अंतर्गत देशातील विविध कार्यकारी सोसाट्यांना १५० प्रकारचे विविध व्यवसाय करण्याची परवानगी मिळालेली आहे. या अंतर्गत समता पतसंस्थेने कोपरगांव शहरातील नावाजलेली कोपरगांव तालुका प्रगत सहकारी सोसायटी चे व्यवस्थापनाची जबाबदारी समता पतसंस्थेने स्विकारलेली आहे. कोपरगांव तालुका प्रगत सहकारी सोसायटीचे चेअरमन वैभव सुर्यभान गिरमे, व्हा. चेअरमन जयश्री अनिल बोरावके व सर्व संचालक मंडळाने यास सहमती दर्शविली आहे. त्यामुळे समताच्या ४० व्या वर्षात कोपरगांव तालुक्यातील शेतक-यांसाठी अनेक व्यवसायिक व सामाजिक कामे करण्याचा संकल्प समताच्या संचालक मंडळाने केला असल्याचे संचालक कचरू मोकळ यांनी सांगितले.

### ठेवी १०० टक्के सुरक्षित

■ जगात सर्वात सुरक्षित समजले जाणारे समताचे सोने तारण कर्ज ६०० कोटी इतक्या रुपयांचे आहे. या कर्जामध्ये १००% वसुली झालेली असल्यामुळे सोने तारण कर्जाचे आधारे समता लिक्वीडीटी बेस प्रोटेक्शन स्किम अंतर्गत ९९.९४% ठेवीदारांच्या ६० लाख रुपयांच्या ठेवी १००% सुरक्षित आहे असे संस्थेचे सरव्यवस्थापक सचिन भट्टड यांनी सांगितले. ६०० कोटी रुपयांच्या सोने तारण कर्जापैकी ५० हजारांचे वर कर्जदारांना कर्ज वितरण केलेले आहे. सुधन गोल्ड लोन मुळे समताच्या अती सुरक्षित समजल्या जाणाऱ्या सोने तारण कर्जात ०% एन.पी.ए. असून थकबाकी ०% राखण्यात यश मिळाले असल्यामुळे एकही कलम थकीत नाही. संस्थेच्या एकुण कर्ज वाटपापैकी ७३% सोने तारण कर्ज समताने वितरीत केले आहे.